# परिशिष्ट

# यशवंत हायस्कूल कराड.

विषय :– इतिहास तारीख :–

गुण :– ( ) इयत्ता ५ वी. – तुकडी :–( )

विद्यार्थ्याचे नांव :–

सूचना :– खालील विधानात रिकाम्या जागा आहेत प्रत्येक विधानासाठी चार पर्याय दिले आहेत. या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुरी करावयाची आहेत. विधानासमोरील रिकाम्या कंसात पर्यायामागील वर्णाक्षर लिहून उत्तरे द्या.

प्रश्न १ ला. :–

उदा. – ______ ही आपली मातृभूमी आहे. ( क )

अ) जपान, ब) चीन, क) भारत, ड) पाकिस्तान

---

१) सिंधू पुत्राची संस्कृती ही ______ हजार वर्षापूर्वीची आहे. ( )

अ) दोन, ब) पाच, क) सहा, ड) आठ

---

मोहेंजोदडो हे ठिकाण ______ प्रांतात आढळते. ( )

अ) पंजाब, ब) बिहार, क) ओरिसा, ड) सिंध

---

३) मोहेंजोदडोयेथील लोक कर म्हणून ______ देत असत. ( )

अ) सोने, ब) चांदी, क) धान्य, ड) गाई

---

४) मोहेंजोदडो येथे सापडलेली डोक्यावर शिंगे असलेली मूर्ती ही ______ होती ( )

अ) विष्णूची, ब) पशूपतीची, क) कृष्णाची, ड) हनुमंताची

---

५) मोहेंजोदडो येथे ______ हा धंदा जोरात चालत असे. ( )

अ) विटा तयार करून भाजणे, ब) मासे मारणे, क) शेती करणे, ड) गाई पाळणे

---

६) हडप्पा हे शहर ______ नदीच्या काठी सापडले. ( )

अ) सतलज, ब) चिनाब, क) सिंधू, ड) रावी

---

७) मोहेंजोदडो येथील घरे ______ नी बांधलेली असत. ( )

अ) माती, ब) सिमेंट, क) दगड, ड) पक्क्या विटा

---

८) आर्यांची पहिली वसाहत ______ या नदीच्या प्रदेशात होती. ( )

सतलज, ब) गंगा, अ) यमुना, क) सिंधू

---

९) आज द्रविडियन संस्कृती मुख्यत: भारताच्या ______ भागात आढळते ( )

अ) पूर्व, ब) पश्चिम, क) उत्तर ड) दक्षिण

१०) प्राचीन कालीन विदेह हे राज्य आजच्या __________ राज्यात होते. ( )

अ) बिहार, ब) पंजाब, क) गुजरात, ड) आंध्र

---

११) युध्दात जय मिळावा म्हणून आर्य लोक __________ प्रार्थना करीत. ( )

अ) वायूची, ब) अग्निची, क) उषेची, ड) इंद्राची

---

१२) आर्यांनी निर्माण केलेल्या चार आश्रमापैकी __________ हा पहिला आश्रम होय. ( )

अ) संन्यासाश्रम, ब) वानप्रस्थाश्रम, क) ब्रम्हचर्याश्रम, ड) गृहस्थाश्रम

---

१३) रामायण हे __________ ऋषींनी रचले. ( )

अ) व्यास, ब) वाल्मिकी, क) वसिष्ठ, ड) सांदिपनी

---

१४) वेद हे __________ भाषेत आहेत. ( )

अ) पाली, ब) हिंदी, क) संस्कृत, ड) मराठी

---

१५) __________ हा आर्यांचा सर्वात जुना व मोठा वेद होय. ( )

अ) यजुर्वेद, ब) ऋग्वेद, क) सामवेद, ड) अथर्ववेद

---

१६) आर्यांच्या समाजात वर्ण हे __________ ठरत असत. ( )

अ) जन्मावरून, ब) व्यवसायावरुन, क) पापपुण्यावरून, ड) धर्मावरून

---

१७) __________ हे लढाई करणे राष्ट्राचे संरक्षण करणे हे कार्य करीत असत. ( )

अ) ब्राम्हण, ब) वैश्य, क) शूद्र, ड) क्षत्रिय

---

१८) गौतम बुद्धांनी स्थापन केलेल्या धर्माला __________ धर्म असे नांव आहे ( )

अ) वैदिक, ब) जैन, क) बौद्ध, ड) इस्लाम

---

१९) __________ हा प्राचीन भारताचा पहिला सम्राट होय. ( )

अ) बिंदुसार, ब) अशोक, क) चंद्रगुप्त मौर्य, ड) समुद्रगुप्त मौर्य

---

२०) प्राचीन कालीन पाटलीपुत्र म्हणजे आजचे __________ शहर होय. ( )

अ) गया, ब) काशी, क) पाटणा, ड) पुणे

२१) चंद्रगुप्त मौर्याने आपल्या राज्याच्या प्रत्येक भागावर ______ नेमले. ( )

अ) पंडीत, ब) कुलपती, क) रज्जुक, ड) नगरपती

---

२२) चंद्रगुप्ताच्या दरबारी ______ हा ग्रीक वकील होता. ( )

अ) मेगॅस्थेनिस, ब) हिरोडोटस, क) सेल्यूकस, ड) आर्यचाणक्य

---

२३) आजचे ______ राज्य म्हणजेच जवळजवळ पूर्वीचा कलिंग देश. ( )

अ) केरळचे, ब) आसामचे, क) पंजाबचे, ड) ओरिसाचे

---

२४) आपल्या राष्ट्रध्वजावर ______ धर्मचक्र आहे. ( )

अ) चंद्रगुप्ताचे, ब) अशोकाचे, क) सिकंदराचे, ड) समुद्रगुप्ताचे

---

२५) अशोकाची राजधानी ______ येथे होती. ( )

अ) दिल्ली, ब) गया, क) पाटलीपुत्र, ड) ठाणेश्वर

---

२६) गौतमीपुत्र सातकर्णी हा सातवाहन घराण्यातील ______ राजा होता. ( )

अ) एकविसाव्या, ब) बाविसाव्या, क) तेविसाव्या, ड) चोविसाव्या

---

२७) सातवाहन घराणे ______ नदीच्या काठावरील प्रदेशात राज्य करीत होते ( )

अ) सिंधू, ब) सतलज, क) गोदावरी, ड) झेलम

---

२८) सातवाहन घराण्याने सुमारे ______ वर्षे राज्य केले. ( )

अ) शंभर, ब) दोनशे, क) तीनशे, ड) चारशे

---

२९) विक्रमादित्य हा पहिल्या चंद्रगुप्ताचा ______ होता. ( )

अ) भाऊ, ब) मुलगा, क) नातू, ड) पणतू

---

३०) विक्रमादित्यानंतर ______ भारतावर हल्ले केले. ( )

अ) शकांनी, ब) हुणांनी, क) कुशाणांनी, ड) पल्लवांनी

सूचना :- पुढील प्रत्येक विधान त्याच्या खाली दिलेल्या कारणापैकी योग्य कारणाने पूर्ण करावयाचे आहे. विधानासमोरील रिकाम्या कंसात कारणामागील फक्त योग्य वर्णाक्षर लिहा.

प्रश्न २ रा. :-

१ मोहेंजोदडो येथील घरे उंच जोत्याची बांधलेली असत. कारण ( )

अ) येथील लोकांना उंचावर रहाण्याची आवड होती.
ब) उंचावर बांधलेली घरे दिसण्यास चांगली असतात असे त्यांना वाटत असे.
क) चोर लुटारुपासून संरक्षण व्हावे हा हेतू होता.
ड) तेथे असणाऱ्या सिंधू नदीच्या महापूरापासून संरक्षण व्हावे हा हेतू होता.

---

२) सुरवातीला आर्यांच्या टोळ्या एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात भटकत असत कारण ( )

अ) त्यांना भटक्या जीवनाची आवड होती.
ब) त्यांना आपल्या गुरांसाठी नवीन नवीन कुरणे शोधावी लागत.
क) त्यांना नवीन नवीन भूप्रदेश पाहण्याची आवड होती.
ड) व्यवसाय शोधण्यासाठी त्यांना फिरावे लागे.

---

३) आर्य लोक सप्तसिंधूच्या प्रदेशातून गंगा व यमुना ह्या नद्यांच्या खोऱ्यात सरकले, कारण ( )

अ) त्यांच्या वाढत्या वस्तीमुळे त्यांना सप्तसिंधूचा प्रदेश अपुरा पडू लागला.
ब) गंगा यमुनेचा प्रदेश फारच सुंदर होता.
क) गंगा-यमुनेच्या खोऱ्यातील हवामान फारच आल्हादायक होते.
ड) सप्तसिंधुच्या प्रदेशातील हवामान त्यांना मानवत नव्हते.

---

४) द्रविडांना दक्षिण भारतात जावे लागले कारण ( )

अ) उत्तर भारत व्यापणाऱ्या आर्यांपुढे त्यांचे काही चालले नाही.
ब) उत्तर भारतातील हवामान त्यांना मानवेनासे झाले.
क) दक्षिण भारतात त्यांना अनेक सोयी उपलब्ध होत्या.
ड) दक्षिण भारतातील हवामान फार आल्हाददायक होते.

---

५) जैन धर्म लोकांना आवडला कारण. ( )

अ) त्यावेळी समाजात दुसरा धर्म नव्हता.
ब) तत्त्वे पाळण्याची लोकांवर सक्ती केली जात होती.
क) धर्माची शिकवण साधी व सोपी होती.
ड) धर्माच्या शिकवणीची भाषा लोकांना आवडणारी होती.

---

६) गौतम बुद्धांनी आपल्या धर्माचा प्रसार पाली भाषेतून केला कारण. ( )

अ) पाली ही भाषा गौतम बुद्धांना जास्त आवडत होती.
ब) त्यावेळची समाजात ती नेहमी बोलली जाणारी भाषा होती.
क) इतर भाषेपेक्षा ती चांगली होती
ड) त्यावेळी त्या भाषेशिवाय इतर भाषाच नव्हती.

७) गौतम बुद्ध घरदार सोडून अरण्यात गेले कारण. ( )

अ) त्यांना आधिक ज्ञानी व्हायचे होते.
ब) त्यांना सुखाचा शोध लावावयचा होता.
क) त्यांना राज्य करण्याची इच्छा नव्हती.
ड) घरच्या लोकांवर रागावून गेले होते.

---

८) पुरू सिकंदराचे दरबारात गेला नाही कारण. ( )

अ) पुरूला कोणाच्या दरबारात जाणे आवडत नव्हते.
ब) पुरूला सिकंदराची भिती वाटत होती.
क) सिकंदराला भेटण्याची त्याची इच्छा नव्हती.
ड) पुरू हा मोठा स्वाभिमानी राजा होता.

---

९) सिकंदराने पुरूचे राज्य त्याला परत दिले कारण. ( )

अ) सिकंदराला पुन्हा युद्ध होईल अशी भिती वाटत होती.
ब) पुरूचे स्वाभिमानी व तेजस्वी उत्तर ऐकून सिकंदरास त्याचे बद्दल आदर वाटला होता.
क) पुरूला लाजविण्याचा त्याचा हेतू होता.
ड) सिकंदरला पराजित राजाचे राज्य नको होते.

---

१०) सिकंदराला मगधावर स्वारी करण्याचा विचार सोडावा लागला कारण. ( )

अ) त्याचे जवळ सैन्य नव्हते.
ब) खूप सैन्य मारले जाईल असे त्याला वाटत होते.
क) त्याचे सैन्य थकल्यामुळे त्यांनीच सिकंदरास विरोध केला होता.
ड) त्याचे सैन्य आधीच निघून गेले होते.

---

११) अंभी राजाने सिकंदराचे भव्य स्वागत केले कारण. ( )

अ) त्याला आपले वैभव दाखवावयाचे होते.
ब) सिकंदराचे मदतीने पुरु ह्या त्याच्या शत्रूचा काटा काढण्याचा त्याचा डाव होता.
क) प्रत्येक राजाचे स्वागत करणे हा त्याची सवय होती.
ड) सिकंदर राजाशी त्याचे मित्रत्वाचे संबंध होते.

---

१२) अशोकाने कलिंग देशावर स्वारी केली कारण. ( )

अ) त्याला तो देश परक्याच्या अंमलातून मुक्त करावयाचा होता.
ब) त्याला हिंसा करण्याची आवड होती.
क) त्याला आपले राज्य वाढवावयाचे होते.
ड) तेथील राजा अशोकाशी नीट वागत नव्हता.

---

१३) अशोकाने शिकार सोडून दिली कारण ( )

अ) कलिंगच्या लढाईनंतर त्याला हिंसेचा वीट आला होता.
ब) त्याच्या शिकारीमुळे रानातील प्राण्याची संख्या कमी होऊ लागली.
क) त्याला शिकारीला जाण्याचा कंटाळा आला होता.
ड) त्याच्या प्रजेला शिकार करणे आवडत नव्हते.

१४) नंदकुळाचा नाश करण्याची आर्य चाणक्याने प्रतिज्ञा केली होती कारण. ( )

अ) नंद राजाशी त्याचे फार दिवसापासून शत्रूत्व होते.
ब) नंद राजाने त्याला हाकलून दिले होते.
क) नंद राजाने भर दरबारात त्याचा अपमान केला होता.
ड) नंद कुळातील सर्व व्यक्तींशीं त्याचे शत्रूत्व होते.

---

१५) गौतमी पुत्र सातकर्णीस त्रिसमुद्रतोयपितवाहन अशी पदवी दिली गेली कारण.

अ) गौतमी पुत्र सातकर्णीचे घोडे भारताच्या तिन्ही बाजूस जाऊन आले होते.
ब) गौतमी पुत्र सातकर्णीने भारताच्या तिन्ही दिशांना समुद्रापर्यंत राज्य वाढविले होते.
क) गौतमी पुत्राचे घोडे भारताच्या तिन्ही बाजूच्या समुद्राचे पाणी प्याले होते.
ड) गौतमी पुत्राने भारताच्या तिन्ही बाजूस घोड्यावरून प्रवास केला होता.

---

१६) गुप्ताच्या काळात भारत देश श्रीमंत झाला कारण ( )

अ) गुप्त राजे परदेशांवर स्वाऱ्या करून तेथून बरीच संपत्ती भारतात आणीत असत.
ब) भारतात तयार होणाऱ्या अनेक वस्तू परदेशात भरपूर किमतीला विकल्या जात असत.
क) अनेक परदेशी प्रवासी भारतात येऊन पैसा खर्च करीत असत.
ड) गुप्तांच्या काळात अनेक संपत्तीचे साठे सापडले होते.

---

१७) फाहिएन हा चिनी पंडीत भारतात आला कारण. ( )

अ) त्याला गुप्त राजाची भेट घ्यावयाची होती.
ब) त्याला भारतातील सुंदर स्थळाविषयी आकर्षण होते.
क) त्याला या देशातील बौद्ध धर्माचा अभ्यास करावयाचा होता.
ड) त्याला प्रवास करण्याची अत्यंत आवड होती.

---

१८) लोक दुसऱ्या चंद्रगुप्तास शकारी म्हणू लागले कारण. ( )

अ) वेगवेगळ्या पदव्या घेण्याची राजाला आवड होती.
ब) तो प्रजादक्ष राजा असल्यामुळे ही पदवी त्याला दिली गेली.
क) शकांचा पराक्रमी राजा रुद्रसिंह याचे राज्य जिंकून आपल्या राज्यास त्याने जोडले या पराक्रमामुळे त्यास शकारी नाव पडले.
ड) चंद्रगुप्ताला अनेक शत्रू होते. अनेकांचा शत्रू म्हणून लोक त्यास शकारी म्हणू लागले.

---

१९) दुसऱ्या चंद्रगुप्ताने स्वतःला विक्रमादित्य ही पदवी घेतली कारण. ( )

अ) चंद्रगुप्ताने गुजरात, सौराष्ट्र ही शकांची राज्ये जिंकल्यावर त्याने पराक्रमाचा सूर्य म्हणून ही पदवी स्वतःला घेतली.
ब) त्याने अनेक शत्रूंचा नाश केला होता म्हणून ही पदवी घेतली
क) गुप्त काळात दुसऱ्या चंद्रगुप्ता इतके मोठे पराक्रम इतर राजाने केले नव्हते म्हणून पदवी घेतली.
ड) दुसऱ्या चंद्रगुप्ताचे काळात राज्याची भरभराट झाली होती म्हणून त्याने स्वतःला ही पदवी घेतली.

---

२०) कलींगचे युद्ध हे अशोकाच्या जीवनात महत्वपूर्ण ठरले कारण ...... ( )

अ) त्यानंतर त्याने युद्ध न करण्याचा निर्णय घेतला होता.
ब) त्यानंतर त्याचे हांतून पशूहत्या होणे बंद झाले.
क) त्यानंतर त्याच्या राज्यात प्रजेकडूनही हत्या होणे बंद झाले.
ड) त्यानंतर त्याच्या राज्यात भांडणे होणे बंद झाले.

परिशिष्ट क्र. II



# यशवंत हायस्कूल, कराड.

तारीख पूर्व चाचणी विषय– इतिहास इ. ५ वी तुकडी

विद्यार्थ्याचे नाव– ______________________ गुण (       )

---

सूचना– खालील विधानात रिकाम्या जागा आहेत. प्रत्येक विधानासाठी चार पर्याय दिले आहेत. या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुरी करायची आहेत. विधानासमोरील रिकाम्या कंसात पर्यायामागील वर्णाक्षर लिहून उत्तरे द्या.

---

१ १) ____________ या पर्वतामुळे आपल्या देशाचे उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान असे दोन भाग पडलेले आहेत. (       )
अ) सातपुडा ब) निलगिरी क) विंध्य ड) गिरनार

---

२) हडप्पा हे शहर ____________ नदीच्या काठी सापडले. (       )
अ) सिंधू ब) गंगा क) यमुना ड) रावी

---

३) मोहेंजोंदडो येथील लोकांचे आरसे ____________ या धातूपासून तयार केलेले असत. (       )
अ) तांबे ब) पितळ क) कासे ड) चांदी

---

४) तालासुरावर गाण्यासाठी रचलेली आर्यांची सूक्ते ____________ या वेदात आहेत. (       )
अ) यजूर्वेद ब) सामवेद क) ऋग्वेद ड) अथर्ववेद

---

५) वर्धमान महावीर हे ____________ तीर्थकर होत. (       )
अ) एकविसावे ब) बाविसावे क) तेविसावे ड) चोविसावे

---

६) गौतम बुद्धास वैशाख शुद्ध ____________ या दिवशी दिव्यज्ञान प्राप्त झाले. (       )
अ) पौर्णिमा ब) एकादशी क) द्वादशी ड) त्रयोदशी

---

७) गौतम बुद्धांनी एकंदर ________ वर्षे आपल्या धर्माचा प्रसार केला. (       )
अ) चाळीस ब) बेचाळीस क) त्रेचाळीस ड) पंचेचाळीस

---

८) गुप्त काळात ____________ हा थोर ज्योतिषी व गणिती होऊन गेला (       )
अ) विशाखादत्त ब) आर्यभट्ट क) कालीदास ड) शूद्रक

---

९) हल्लीचे ________ हे गाव पूर्वी सातवाहन राजांची वैभवशाली राजधानीचे शहर म्हणून प्रसिद्ध होते. (       )
अ) गया ब) जुन्नर क) नाशिक ड) पैठण

१०) सिकंदराचा सरदार ______ याने चंद्रगुप्तावर स्वारी केली होती. ( )
अ) हिरोडोटस ब) मेगॅस्थेनिस क) सेल्यूकस ड) फाहिएन

---

११) सातवाहन घराणे ______ नदीच्या काठावरील प्रदेशात राज्य करीत होते. ( )
अ) झेलम ब) कृष्णा क) चिनाब ड) गोदावरी

---

१२) विक्रमादित्य हा पहिल्या चंद्रगुप्ताचा ______ होता. ( )
अ) भाऊ ब) मुलगा क) नातू ड) पणतू

---

१३) पूर्वीचा प्रतिष्ठान या गावाला हल्ली ______ या नावाने ओळखतात.
अ) कल्याण ब) पैठण क) लखनौ ड) कार्ला ( )

---

सूचना– पुढील प्रत्येक विधान त्याच्याखाली दिलेल्या कारणापैकी योग्य कारणाने पूर्ण करावयाचे आहे. विधानासमोरील रिकाम्या कंसात योग्य कारणामागील फक्त वर्णाक्षर लिहा.

---

२ १) मोहेंजोदडो येथील घरे उंच जोत्याची बांधलेली असत. कारण ( )
अ) येथील लोकांना उंचावर राहण्याची आवड होती.
ब) उंचावर बांधलेली घरे दिसण्यास चांगली असतात असे त्यांना वाटत असे
क) चोर लुटारुपासून संरक्षण व्हावे हा त्यांचा हेतू होता.
ड) तेथे असणाऱ्या सिंधू नदीच्या महापूरापासून संरक्षण व्हावे हा हेतू होता

---

२) सुरुवातीला आर्यांच्या टोळ्या एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात भटकत असत. कारण– ( )
अ) त्यांना भटक्या जीवनाची आवड होती.
ब) त्यांना नवीन नवीन भूप्रदेश पाहण्याची आवड होती.
क) त्यांना आपल्या गुरांसाठी नवीन नवीन कुरणे शोधावी लागत असत
ड) व्यवसाय शोधण्यासाठी त्यांना फिरावे लागत असे.

---

३) आर्य लोक सप्तसिंधूच्या प्रदेशात गंगा व यमुना ह्या नद्यांच्या खोऱ्यात सरकले कारण ( )
अ) गंगा यमुना नद्यांचा प्रदेश फारच सुंदर होता.
ब) त्यांच्या वाढत्या वस्तीमुळे त्यांना सप्तसिंधूचा प्रदेश अपुरा पडू लागला
क) सप्तसिंधूच्या प्रदेशातील हवामान त्यांना मानवत नव्हते
ड) गंगा-यमुनेच्या खोऱ्यातील हवामान फार आल्हाददायक होते.

---

४) वर्धमान आपल्या धर्माचा उपदेश अर्धमागधी भाषेतून करीत कारण ( )
अ) अर्धमागधी ही भाषा वर्धमानांना जास्त आवडत होती.
ब) इतर भाषापेक्षा ती चांगली भाषा होती.
क) त्यावेळच्या लोकांची ती व्यवहाराची भाषा होती.
ड) त्यावेळी त्या भाषेशिवाय इतर भाषाच नव्हत्या

५) गौतम बुद्ध घरदार सोडून अरण्यात गेले कारण ( )

अ) त्यांना आधिक ज्ञानी व्हावयाचे होते.

ब) त्यांना राज्य करण्याची इच्छा नव्हती.

क) घरच्या लोकांवर ते रागावून गेले होते

ड) त्यांना सुखाचा शोध लावावयाचा होता

---

६) अंभी राजाने सिकंदराचे भव्य स्वागत केले. कारण ( )

अ) त्याला आपले वैभव सिकंदराला दाखवावयाचे होते.

ब) सिकंदराचे मदतीने पुरु ह्या त्याच्या शत्रुचा काटा काढण्याचा त्याचा डाव होता

क) प्रत्येक राजाचे स्वागत करणे ही त्याची आवड होती.

ड) सिकंदर राजाशी त्याचे मित्रत्वाचे संबंध होते.

---

७) सिकंदराला मगधावर स्वारी करण्याचा विचार सोडावा लागला. कारण- ( )

अ) शेवटी त्याचेजवळ सैन्यच शिल्लक राहिले नाही.

ब) खूप सैन्य मारले जाईल असे त्याला वाटत होते.

क) त्याचे सैन्य थकल्यामुळे त्यांनीच सिकंदराला विरोध केला होता.

ड) त्याचे सैन्य आधीच निघून गेले होते.

---

८) गौतमीपुत्र सातकर्णीस त्रिसमुद्रतोयपितवाहन अशी पदवी दिली गेली कारण– ( )

अ) गौतमी पुत्र सातकर्णीचे घोडे भारताच्या तिन्ही बाजूस जाऊन आले होते.

ब) गौतमी पुत्र सातकर्णीने भारताच्या तिन्ही दिशांना समुद्रापर्यंत राज्य वाढविले होते.

क) गौतमी पुत्राचे घोडे भारताच्या तिन्ही बाजूच्या समुद्राचे पाणी प्याले होते.

ड) गौतमी पुत्राने भारताच्या तिन्ही बाजूस घोड्यावरुन प्रवास केला होता.

---

९) गुप्ताच्या काळात भारत देश श्रीमंत झाला कारण– ( )

अ) गुप्त राजे परदेशांवर स्वाऱ्या करुन तेथील बरीच संपत्ती भारतात आणीत असत

ब) भारतात तयार होणाऱ्या अनेक वस्तू परदेशात भरपूर किंमतीला विकल्या जात असत.

क) अनेक परदेशी प्रवासी भारतात येऊन पैसा खर्च करीत असत.

ड) गुप्तांच्या काळात अनेक संपत्तीचे साठे सापडले होते

---

१०) फाहिएन हा चिनी पंडीत भारतात आला कारण– ( )

अ) त्याला गुप्त राजाची भेट घ्यावयाची होती.

ब) त्याला भारतातील सुंदर स्थळांविषयी आकर्षण वाटत होते.

क) त्याला या देशातील बौद्ध धर्माचा अभ्यास करावयाचा होता.

ड) त्याला प्रवास करण्याची अत्यंत आवड होती.

११) कलिंगचे युद्ध हे अशोकाच्या जीवनात महत्वपूर्ण ठरले कारण- ( )

अ) त्यानंतर त्याने युद्ध न करण्याचा निर्णय घेतला होता.
ब) त्यानंतर त्याचे हातून पशूहत्या होणे बंद झाले.
क) त्यानंतर त्याच्या राज्यात प्रजेकडूनही हत्या होणे बंद झाले.
ड) त्यानंतर त्याच्या राज्यात तंटे-बखेडे होणे बंद झाले.

---

१२) दुसऱ्या चंद्रगुप्ताने स्वतःला विक्रमादित्य ही पदवी घेतली कारण- ( )

अ) त्याने अनेक शत्रुंचा नाश केला होता म्हणून ही पदवी घेतली.
ब) गुप्त काळात दुसऱ्या चंद्रगुप्ताइतके मोठे पराक्रम इतर राजानी केले नव्हते म्हणून ही पदवी घेतली.
क) दुसऱ्या चंद्रगुप्ताचे काळात राज्याची भरभराट झाली होती म्हणून त्याने स्वतःला ही पदवी घेतली.
ड) चंद्रगुप्ताने गुजरात, सौराष्ट्र ही शकांची राज्ये जिंकल्यावर त्याने पराक्रमाचा सूर्य म्हणून ही पदवी स्वतःला घेतली.

परिशिष्ट III

**चाचणीची सप्रमाणता अजमावणारे तज्ञ शिक्षक**

| अ.क्र. | शिक्षकांचे नाव | शैक्षणिक अर्हता | अध्यापनानुभव |
|---|---|---|---|
| 1) | श्री. चव्हाण विजय विष्णुपंत | एम्.ए. एम्.एड्. | 26 |
| 2) | श्री. नागनुरे नारायण शंकर | एम्.ए.बी.एड्. | 24 |
| 3) | श्री. सुरवसे मगन पंढरीनाथ | एम्.ए.एम्.एड्. | 19 |
| 4) | श्री. बोरगे बाळकृष्ण मारुती | एम्.ए. एम्.एड्. | 16 |
| 5) | डॉ. गुरव हिरोजी कृष्णाजी | एम्.ए.एम्.एड्. पीएच्. डी. | 13 |

परिशिष्ट क्र IV



# यशवंत हायस्कूल, कराड.

चाचणी क्र १ | विषय– इतिहास | इ ५ वी | तुकडी

विद्यार्थ्याचे नांव– ______________________ गुण (      )

---

सूचना– खालील विधानात रिकाम्या जागा आहेत. प्रत्येक विधानासाठी चार पर्याय दिले आहेत. या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुरी करावयाची आहेत. विधानासमोरील रिकाम्या कंसात पर्यायामागील वर्णाक्षर लिहून उत्तरे द्या.

---

१ १) दक्षिण भारतातील सम्राट __________ हा हर्षाचा समकालीन होता. (      )
अ) चंद्रगुप्त ब) समुद्रगुप्त क) अशोक ड) दुसरा पुलकेशी

---

२) प्रभाकरवर्धन हा __________ येथे राज्य करीत होता. (      )
अ) कनोज ब) ठाणेश्वर क) कपिलवस्तू ड) तक्षशिला

---

३) युवान श्वांग हा एक __________ होता. (      )
अ) थोर राजा ब) धर्मपंडित क) शूर वीर ड) पराक्रमी सरदार

---

४) युवान श्वांग हा __________ देशातून भारतात आला होता. (      )
अ) जपान ब) पाकिस्तान क) चीन ड) सयाम

---

५) __________ ही बौद्ध धर्माची जन्मभूमी आहे. (      )
अ) भारत ब) मलाया क) सिलोन ड) ब्रम्हदेश

---

६) युवान श्वांगच्या काळात उत्तर भारतात __________ हा राजा राज्य करीत होता. (      )
अ) पुलकेशी ब) समुद्रगुप्त क) अशोक ड) हर्षवर्धन

---

७) प्रभाकरवर्धनाचे राज्यावर __________ स्वाऱ्या होत होत्या. (      )
अ) हूणांच्या ब) शकांच्या क) यवनांच्या ड) पल्लवांच्या

---

८) गझनीच्या महमूदाने भारतावर एकूण __________ स्वाऱ्या केल्या. (      )
अ) पांच ब) आठ क) तेरा ड) सतरा

---

९) गझनीच्या महमूदाने __________ मंदिर उध्वस्त केले. (      )
अ) पुरीचे ब) सोमनाथचे क) शृंगेरीचे ड) काशीचे

१०) संयोगिता ही ________ राजाची कन्या होती. (      )
अ) अनंगपाळ ब) पृथ्विराज चौहाण ३) सोमेश्वर ४) जयचंद राठोड

---

११) प्राचीन काळी मगध येथे ________ नावाचे एक प्रसिद्ध विद्यापीठ होते. (      )
अ) तक्षशिला ब) वल्लभी क) नालंदा ड) कुरुक्षेत्र

---

१२) सम्राट हर्षवर्धनाचा ________ हा विशेष स्वभावगुण दिसून येतो. (      )
अ) हळवा ब) प्रेमळ क) दानशूर ड) संयमी

---

१३) पृथ्विराजाच्या ________ मुळे तो शत्रूच्या हाती सापडला. (      )
अ) स्वार्थीपणा ब) आळशीपणा क) संकुचितपणा ड) बेसावधपणा

---

१४) युवाश्वांग अनेक संकटावर मात करुन भारतात आला यावरुन त्याचा (      )
________ हा स्वभावविशेष दिसून येतो.
अ) धाडस ब) जिद्दी क) शूर ड) हेकट

---

१५) गझनीच्या महमूदाच्या भारतावरील अनेक स्वाऱ्यामागे त्याचा (      )
________ हा स्वभावगुण दिसून येतो.
अ) लढावूवृत्ती ब) धूर्तवृत्ती क) लोभीवृत्ती ड) धोरणीवृत्ती

---

१६) युवान श्वांग हा ________ होता. (      )
अ) कलाप्रेमी ब) विचारी क) विद्याप्रेमी ड) तत्वज्ञानी

---

१७) पृथ्विराजाच्या चरित्रावरुन तो एक ________ रजपूत (      )
राजा होता असे दिसते.
अ) उदार ब) सहनशील क) लहरी ड) स्वाभिमानी

---

२ खालील विधाने त्यांच्याखाली दिलेल्या कारणापैकी योग्य कारणाने पूर्ण करा.
योग्य कारणामागील असणारे फक्त वर्णाक्षर विधानासमोरील कंसात लिहा.

१) गझनीच्या महमूदाने भारतावर अनेक स्वाऱ्या केल्या कारण (      )
अ) त्याला भारतीय राजांचा पराभव करावयाचा होता.
ब) त्याला भारतातील संपत्ती लूटून न्यावयाची होती.
क) त्याला भारतात इस्लाम धर्माचा प्रसार करावयाचा होता.
ड) त्याला भारतात इस्लाम धर्माविषयी माहिती मिळवावयाची होती.

२) पंजाबच्या जयपाळ राजाने चितेत उडी घेतली कारण ( )

अ) गझनीच्या महमूदाने त्याचा पराभव करुन सिंधचा कांही भाग आपल्या राज्याला जोडला याचे त्या स्वाभिमानी राजाला अत्यंत दुःख झाले.

ब) गझनीच्या महमूदाने त्याला बरीच संपत्ती देण्यास भाग पाडले.

क) इतर भारतीय राजांकडून त्याचा स्वाभिमान दुखावला गेला होता.

ड) इतर आसपासच्या भारतीयांनी त्याची संपत्ती लुटून नेली होती.

---

३) गझनीच्या महमूदाने हळहळत प्राण सोडला. कारण ( )

अ) त्याचे राज्यविस्ताराचे काम अजून पुरे व्हावयाचे होते.

ब) त्याच्या राज्याची घडी अजून नीट बसवावयाची होती.

क) त्याला आपल्या मागील कृत्यांचा पश्चाताप झाला होता.

ड) आपल्याला आपले सर्व वैभव सोडून जावे लागणार याचे त्याला वाईट वाटले.

---

४) युवान श्वांग भारतात आला होता. कारण ( )

अ) भारतातील लोकांना बौद्ध धर्माचे ज्ञान द्यावे असा त्याचा हेतू होता.

ब) बौद्ध जन्मभूमीला भेट देऊन धर्मविषयी अधिक ज्ञान मिळवावे विद्वानांशी चर्चा करावी हा त्याचा हेतू होता

क) बौद्ध धर्माचा प्रसार करावा असा त्याचा हेतू होता.

ड) भारतातील विविध धर्मांविषयी ज्ञान मिळवावे हा त्याचा हेतू होता.

---

५) राज्यवर्धनाने देवगुप्तास ठार मारले. कारण ( )

अ) देवगुप्ताने राज्यगुप्ताने वडील प्रभाकरवर्धन यास ठार मारले होते.

ब) देवगुप्ताने राज्यवर्धनाच्या राज्यावर स्वारी केली होती.

क) देवगुप्ताने राज्यवर्धनाची बहिण राजश्री हीस ठार मारले होते.

ड) देवगुप्ताने राज्यवर्धनाच्या राजश्री ह्या बहिणीच्या पतीस-ग्रहवर्म्यास ठार मारले होते.

---

६) चीनच्या बादशहाने युआनश्वांगचा मोठा गौरव केला. कारण ( )

अ) युआनश्वांग संपूर्ण भारत फिरुन आला होता

ब) युआनश्वांग भारतातून सर्व धर्मांची माहिती मिळवून आला होता.

क) युआनश्वांग भारतातून मोठी कीर्ती मिळवून आला होता.

ड) युआनश्वांग बौद्ध धर्माचा भारतात प्रसार करुन आला होता.

---

७) अनंगपाळच्या सैन्याचा धीर खचला. कारण ( )

अ) शत्रुसैन्याच्या बाणांनी अनंगपाळचा हत्ती घायाळ होऊन सैरावैरा धावू लागला, यामुळे आपला राजा माघार घेत आहे असे वाटले

ब) अनंगपाळ युद्धात मारला गेला असे सैन्याला वाटले.

क) अनंगपाळ युद्धातून पळून गेला असे सैन्याला वाटले.

ड) अनंगपाळ शत्रुस जाऊन मिळाला असे सैन्याला वाटले.

८) उत्तर हिंदुस्थानातील रजपूत राजांचा काही मुलूख घुरीला सहजा-सहजी मिळाला. कारण ( )

अ) उत्तर हिंदुस्थानातील रजपूत राजांनी पृथ्वीराजाचा पराभव होतो आहे हे पहाताच एकत्र येऊन चितेत उड्या घेतल्या, त्यामुळे त्यांचा मुलूख मिळाला.

ब) पृथ्विराजाचा पराभव झाल्यामुळे उत्तर हिंदुस्थानातील रजपूत राजे घाबरुन ते आपली राज्ये सोडून पळून गेले. त्यामुळेच त्यांचा मुलूख अनायासेच घुरीला मिळाला.

क) उत्तर हिंदुस्थानातील रजपुतानी घुरीचा पराक्रम पाहून शरण येऊन त्याचे मांडलिकत्व पत्करले त्यामुळे त्याचा मुलूख मिळाला.

ड) उत्तर हिंदुस्थानातील रजपूत राजांना आपली राज्ये नको होती ती घुरीला दिल्यामुळे अनायासेच त्याला तो मुलूख मिळाला.

परिशिष्ट क्र. V



# यशवंत हायस्कूल, कराड.

चाचणी क्र २ विषय– इतिहास इ. ५ वी तुकडी

विद्यार्थ्याचे नांव-______________________ गुण (     )

---

सूचना- खालील विधानात रिकाम्या जागा आहेत. प्रत्येक विधानासाठी चार पर्याय दिले आहेत. या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधान पुरे करावयाचे आहे. विधानासमोरील रिकाम्या चौकटीत पर्यायामागील वर्णाक्षर लिहून उत्तरे द्या.

---

१ १) कृष्णदेवराव हा __________ चा राजा होता. (     )
अ) कनोज ब) देवगिरी क) उज्जयिनी ड) विजयनगर

२) शंकरदेव हा रामदेवरायाचा __________ होता. (     )
अ) मुलगा ब) जावई क) भाऊ ड) पुतण्या

३) __________ ही यादवांची राजधानी होती (     )
अ) वेरूळ ब) पैठण क) देवगिरी ड) कनोज

४) अल्लाउद्दीन हा जलाउद्दीन खिलजीचा __________ होता (     )
अ) मुलगा ब) भाऊ क) पुतण्या ड) जावई

५) मलिक काफूर हा __________ सेनापती होता (     )
अ) कृष्णदेवरायाचा, ब) रामदेवरायाचा क) हरपाळदेवाचा
ड) अल्लाउद्दीनचा

६) यादव राजे ते स्वत:ला __________ वंशज मानीत (     )
अ) परशुरामाचे, ब) इंद्राचे क) विष्णूचे ड) श्रीकृष्णाचे

७) विजयनगर हे ठिकाण __________ नदीच्या तीरावर वसले होते (     )
अ) तुंगभद्रा ब) गोदावरी क) कृष्णा ड) कावेरी

८) बाबर हा अगोदर __________ येथे राज्य करीत होता. (     )
अ) काबूल ब) कंदाहार क) इस्तंबूल ड) रंगून

९) __________ हा लोदी घराण्यातील शेवटचा सुलतान ठरला (     )
अ) बहलोलखान ब) इब्राहिमखान क) दौलतखान
ड) फिरोजखान

१०) अकबराचा जन्म __________ येथे झाला. (        )
अ) काबुल ब) रंगून क) उमरकोट ड) कंदाहार

---

११) हा दीने-इ-लाही धर्माचा संस्थापक होता (        )
अ) हुमायून ब) बाबर क) अकबर ड) हेमू

---

१२) शिखांचे प्रसिद्ध सुवर्णमंदीर __________ येथे आहे. (        )
अ) सूरत ब) गया क) अमृतसर ड) फत्तेपूर सिक्री

---

१३) अकबराचे कारकिर्दीत __________ हा प्रसिद्ध गवई होउन गेला (        )
अ) तोडरमल ब) बिरबल क) तानसेन ड) अब्दुलरहीम

---

१४) __________ याने भगवत्गीतेचे फारशीत भाषांतर केले (        )
अ) बिरबल ब) बैरामखान क) फैजी ड) तोडरमल

---

१५) भास्कराचार्य हे __________ होते (        )
अ) थोर संत ब) गणिती क) पंडित ड) आद्य कवी

---

१६) रामदेवरायाच्या __________ ह्या स्वभाव दोषामुळेच देवगिरीचे (        )
राज्य शत्रुच्या हाती लागले.
अ) लहरीपणा ब) धूर्तपणा क) बेसावधपणा हेकटपणा

---

१७) अल्लाउद्दीनने आपल्या चुलत्याचा वध केला यावरून त्याचा (        )
__________ हा स्वभाव दिसून येतो.
अ) लोभी ब) विश्वासघातकी क) धोरणी ड) बेजबाबदार

---

२ पुढील विधाने त्यांच्याखाली दिलेल्या कारणापैकी योग्य कारणांनी पूर्ण करा
योग्य असेल त्या कारणामागील फक्त वर्णाक्षर विधानासमोरील चौकटीत लिहा.

१) विद्यारण्य स्वामीनी विजयनगरच्या राज्याच्या स्थापनेबाबत मदत केली. (        )
कारण —
अ) त्यांना मोठाली कार्ये करण्याची आवड होती.
ब) हिंदुचे स्वतंत्र राज्य स्थापन व्हावे अशी त्याची उत्कट इच्छा होती.
क) एखादे सत्कार्य करण्याची त्यांची फार दिवसाची इच्छा होती.
ड) त्यांना हरिहर व बुक्क यांना मदत करायची होती.

२) विजय नगर व बहामनी या राज्यात सतत युद्धे होत असत कारण ( )

अ) त्या दोन्हीही सत्ता आक्रमक प्रवृत्तीच्या होत्या

ब) त्या दोन्ही राज्यांच्या राज्यकर्त्यांमध्ये कायमचे शत्रुत्व होते.

क) त्या दोघांनाही कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यांमधील सुपिक प्रदेशावर ताबा हवा होता.

ड) त्या दोन्ही राज्यांच्या राज्यकर्त्यांजवळ मोठे सैन्यबळ होते

---

३) तालिकोटची लढाई ही विजय नगरच्या राज्याला पूर्णपणे घातक ठरली ( ) कारण —

अ) त्यात विजयनगरचे असंख्य सैन्य मारले गेले.

ब) त्यात विजयनगरचा जोरदार पराभव झाला

क) त्या लढाईत विजयनगरचा खूप पैसा खर्च झाला.

ड) त्या लढाईने विजयनगरच्या वैभवशाली साम्राज्याचा शेवट केला.

---

४) उदयसिंह हा अकबराचा मांडलिक झाला नाही कारण ( )

अ) अकबराचे मांडलिकत्व स्विकारण्याची त्याची वृत्ती नव्हती

ब) उदयसिंहाला आपल्या क्षत्रिय घराण्याचा व उच्च कुळाचा अभिमान होता

क) आपले राज्य त्याने इतर सत्तांना वाटून दिले होते.

ड) अगोदरच तो दुसऱ्या एका सत्तेचा मांडलिक राजा झाला होता.

---

५) अकबराने राजपूतांशी मैत्रीचे धोरण ठेवले कारण ( ).

अ) रजपूत हे क्रूर असल्याने त्याचा आपणास उपद्रव होऊ नये असे अकबराचे म्हणणे होते.

ब) रजपूत हे आक्रमक चढाऊ वृत्तीचे होते त्यांनी आपल्यावर स्वारी करू नये असे अकबराचे म्हणणे होते.

क) शुर व धर्मनिष्ठ रजपूत आपल्याला उपयोगी पडतील यासाठी स्नेहाचे व गोडीगुलाबीचे धोरण ठेवले.

ड) रजपूतांच्या तोडीचे दुसरे कोणीही नव्हते. यासाठी त्यांचेशी मैत्रीचे संबध ठेवले गेले.

---

६) बाबराने दारू सोडल्याचे जाहीर केले. कारण ( )

अ) त्याचा पराभव झाला होता म्हणून पश्चातापामुळे ती सोडून त्याने जाहिर केले.

ब) धर्मामध्ये तशी आज्ञा होती. व ती पाळल्याने आपले सैनिक लढाईत उत्साहाने व प्राणपणाने लढावेत यासाठी जाहीर केले.

क) त्यामुळे बाबराला खूप त्रास होत होता म्हणून जाहीर केले.

ड) जनतेचे आपल्याबद्दल अनुकूल मत व्हावे यासाठी जाहीर केले

७) अहमदनगरचा किल्ला घेण्यासाठी स्वत: अकबराला यावे लागले कारण (        )

अ) बरेच दिवस पराक्रमी चांदबिबीशी लढा देउनही अकबराचा मुलगा मुराद यास अहमदनगरचा किल्ला घेता आला नाही.

ब) चांदबिबीचे या अकबराशी झालेल्या उर्मट वर्तनामुळे तो संतापला होता.

क) चांदबिबीने अकबराचा मुलूख आपल्या ताब्यात घेतला होता.

ड) चांदबिबीचा मुलुख तहान्वये अकबराकडे येऊनही ती तो भाग अकबरास द्यावयास तयार नव्हती

---

८) अल्लाउद्दीनने मलिक काफूर यास रामदेवरायावर पाठविले कारण (        )

अ) रामदेवरायाने कांही वर्षांनी खंडणी देणे बंद केले होते.

ब) रामदेवराया चा आणखी मुलुख घेण्याची त्याची इच्छा होती.

क) रामदेवराय इतरांशी संधान बांधुन अल्लाउद्दीन बिरूद्ध युद्धाची तयारी करीत होता.

ड) रामदेवरायाच्या राज्यातून आणखी संपत्ती मिळविण्याचा त्याचा हेतू होता.

परिशिष्ट क्र. VI



# यशवंत हायस्कूल, कराड.

चाचणी क्र. ३ विषय – इतिहास इ. ५ वी तुकडी

विद्यार्थ्याचे नांव ______________________ गुण ( )

---

सूचना– खालील विधानात रिकाम्या जागा आहेत. प्रत्येक विधानासाठी चार पर्याय दिले आहेत. या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुरी करावयाची आहेत. विधानासमोरील रिकाम्या कंसात पर्यायामागील वर्णाक्षर लिहून उत्तरे द्या.

---

१ १) राणा प्रतापाला ____________ ह्या त्याच्या इमानी घोड्याने वाचविले ( )
अ) सम्राट ब) चेतक क) विजय ड) सरदार

---

२) मेवाडचा राणा प्रताप हा ____________ याचा मुलगा होता. ( )
अ) राणा अमरसिंह ब) राणा प्रतापसिंह क) राणा उदयसिंह ड) राणा अजयसिंह

---

३) ____________ कारकिर्दीत मुघल साम्राज्याचे वैभव बरेच वाढले. ( )
अ) बाबरच्या ब) हुमायूनच्या क) औरंगजेबाच्या ड) शाहजहानच्या

---

४) ____________ हा शाहजहानचा मुख्य प्रधान होता. ( )
अ) आसफखान ब) बैरामखान क) युसुफखान ड) इब्राहिमखान

---

५) ताजमहाल ही सुंदर इमारत शाहजहानची लाडकी राणी ____________ हिच्या स्मरणार्थ बांधण्यात आली. ( )
अ) मुमताज महल ब) हमिदा क) नुरजहान ड) शहिदाबानू

---

६) शाहजहानच्या सर्वात मोठ्या मुलाचे नाव ____________ होते. ( )
अ) औरंगजेब ब) मुराद क) सलीम ड) दारा

---

७) गुरू ____________ हे शीख धर्माचे संस्थापक होते. ( )
अ) नानक ब) तेघबहाद्दर क) गोविंदसिंग ड) आनंदसिंग

---

८) गुरु नानकांचेनंतर त्यांच्या गादीवर एकूण ____________ गुरु झाले ( )
अ) सात ब) नऊ क) अकरा ड) तेरा

---

९) ____________ महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक होते ( )
अ) शहाजी ब) शिवाजी क) संभाजी ड) मालोजी

१०) औरंगजेब हा __________ स्वभावाचा होता ( )
अ) विश्वासघातकी ब) हेकट क) लहरी ड) स्वार्थी

---

११) औरंगजेबाने __________ येथे शिवाजी महाराजांना कैद केले होते. ( )
अ) गया ब) काशी क) आग्रा ड) मथुरा

---

१२) औरंगजेब __________ या शहराजवळ मरण पावला
अ) संगमेश्वर ब) अहमदनगर क) तुळजापूर ड) औरंगाबाद

---

१३) शिवाजी महाराजांचे निधन इ. स. __________ मध्ये झाले ( )
अ) १६८५ ब) १६८३ क) १६८१ ड) १६८०

---

सूचना पुढील प्रत्येक विधान त्याच्याखाली दिलेल्या कारणापैकी योग्य कारणाने करावयाचे आहे. विधानासमोरील रिकाम्या कंसात योग्य कारणामागील फक्त वर्णाक्षर लिहून उत्तर द्या.

---

१४) औरंगजेबाने अखेरीस रजपूतांशी तह केला कारण ( )
अ) त्याच्या सैनिकांनी रजपुतांशी लढण्याचे नाकारले
ब) रजपुतांनी गनिमी काव्याने लढून त्याला जेरीस आणले
क) त्याचे सैन्य त्याच्याविरुद्ध चिडून उठले
ड) औरंगजेबाचे इतर शत्रू रजपुतास येऊन मिळाले

---

१५) गुरु गोविंद सिघांनी शीख लोकांची वीर संघटना उभारली कारण ( )
अ) औरंगजेबाच्या व त्याच्या धार्मिक छळाचा प्रतिकार करावयाचा होता
ब) शूर शीख लोकांची तशी मागणी होती.
क) शीख लोकांशी औरंगजेब कपटाने वागत होता.
ड) त्यांना शीख लोकांचे राज्य स्थापन करावयाचे होते.

---

१६) गुरु गोविंदसिंघ औरंगजेबाला भेटावयास गेले नाहीत कारण ( )
अ) औरंगजेब त्यांच्याविषयी योग्य आदर दाखवत नसे
ब) औरंगजेब नेहमी त्यांच्याविरुद्धप्रचार करीत असे
क) औरंगजेबाचे गुरु गोविंदसिघाशी खूप दिवसापासून वैरत्व होते
ड) औरंगजेबाचा कपटी स्वभाव त्यांना माहीत होता

---

१७) रजपुतांनी औरंगजेबाविरुद्ध युद्ध पुकारले कारण ( )
अ) रजपूतराजांनी बादशाहीला संरक्षण देउनही रजपुताचे राज्य बुडविण्याचा उद्योग त्याने आरंभिला होता
ब) रजपूतांशी तो कपटाने वागत होता
क) रजपुत राज्ये खालसा करण्याचा सपाटा औरंगजेबाने चालविला होता

ड) रजपुतांनी त्याला अनेक लढायात मदत केली असताना औरंगजेब रजपूतांविषयी अंतर्गत कारस्थाने रचित होता

---

१८) शिवाजी महाराजांनी जयसिंगाबरोबर तह केला कारण ( )

अ) शिवाजी राजांचे सैन्य कंटाळले होते
ब) शिवाजी राजांच्या सैन्याने बंडच पुकारले होते.
क) ह्या बलाढ्य सरदाराशी दोन हात करण्यात असणारे थोडे सैन्य मारले जाईल, जयसिंगाशी लढण्यात अर्थ नाही हे राज्यांनी जाणले होते
ड) राजांचे जवळ सैन्यच नसल्याने त्यांनी लढाई न करण्याचा निर्णय घेतला होता.

---

१९) शिवाजी राजांनी स्वतःला राज्याभिषेक करुन घेतला कारण ( )

अ) राज्याभिषेक करवून घेण्याची राजांची खूप दिवसापासूनची इच्छा होती.
ब) मायभूमीच्या रक्षणासाठी मराठ्यांचे स्वराज्य स्थापन झाले हे जगजाहीर व्हावे असे राजांचे म्हणणे होते.
क) इतर सत्तेप्रमाणे हिंदुचीही सत्ता स्थापिली गेली हे इतर सत्ताना जाहीर व्हावे असे राजांचे म्हणणे होते.
ड) आपल्या हिंदवी स्वराज्याचा छत्रपती म्हणून नाव जाहीर व्हावे असा राजांचा अट्टाहास होता.

---

२०) औरंगजबाने संभाजीस ठार मारले कारण ( )

अ) औरंगजेबाचा मुलगा अकबर हा संभाजीस सामील झाला होता व दोघे मिळून मुघल सत्तेविरुद्ध कूटकारस्थाने करता आहेत असे औरंगजेबास वाटले.
ब) औरंगजेबाच्या सैन्यात बंड घडवून आणण्याचा संभाजीचा प्रयत्न चाललेला होता.
क) औरंगजेबाच्या मुस्लीम धर्मास संभाजी तुच्छ लेखत असे
ड) ' मुस्लीम धर्माचा स्विकार कर ' या औरंगजेबाच्या म्हणण्यास स्वाभिमानी संभाजीने नकार दिला होता

---

२१) औरंगजेब स्वतः मोठ्या तयारीने दक्षिणेत आला कारण ( )

अ) त्याला मराठ्यांचे राज्य जिंकावयाचे होते व बंड करून संभाजीस सामील होणाऱ्या आपल्या मुलास शासन करावयाचे होते
ब) त्याला दक्षिणेत असणाऱ्या आपल्या मुलास गोडी गुलाबीने बोलावून नेऊन त्याचे हाती दिल्लीची गादी सोपवावयाची होती
क) त्याला, सर्व हिंदु लोकांना मुस्लीम धर्म स्विकारावयास लावून मुस्लीम धर्माचा प्रसार करावयाचा होता.
ड) त्याला दक्षिणेतील संपत्तीची केवळ भरपूर लूट करुन न्यावयाची होती

२२) राजारामाच्या मृत्युनेही औरंगजेबाला मराठी राज्य बुडविता आले नाही ( )

अ) राजारामाची पत्नी ताराबाई हिने हे युद्ध असेच हिरीरीने चालू ठेवले होते.

ब) राजारामाच्या मुलाने मोठ्या धैर्याने मराठी राज्याचे संरक्षण केले होते.

क) औरंगजेबाचे सैन्य पूर्णपणे कंटाळले होते ते लढण्यास तयार नव्हते

ड) औरंगजेबाचे सैन्य मराठ्यांना फितूर झाले होते

---

२३) अकबराने राणा प्रतापविरुद्ध युद्ध पुकारले कारण ( )

अ) राणा प्रतापाने अकबरास युद्धाचे आव्हान दिले होते

ब) मांडलिकत्व पत्करावे या हेतूने अकबराने पाठविलेल्या त्यांचा सेनापती मानसिंग याची स्वाभिमानी राणा प्रतापने भेट घेतली नाही

क) अकबराच्या सैन्यात राणा प्रतापाने फितूरी केली होती

ड) आपले राज्य वाढवावे असा अकबराचा हेतू होता

---

२४) हळदी घाटाच्या लढाईत राणा प्रतापाचा पराभव झाला कारण ( )

अ) या लढाईमध्ये राणा प्रतापचे असंख्य सैनिक मारले गेले होते.

ब) या लढाईमध्ये राणा प्रतापचा लाडका चेतक घोडा जबर जखमी झाला होता.

क) या लढाईमध्ये राणा प्रतापाचे सैन्यात एकीचा अभाव होता.

ड) या लढाईमध्ये राणा प्रतापाचे सैन्यामध्ये अन्नधान्याचा पुरवठा वेळेवर झाला नसल्याने त्यांची उपासमार झाली होती

---

२५) शहाजहानच्या कारकिर्दीत देशात विद्या व कला यांना उत्तेजन मिळाले ( )

अ) शहाजहानचे काळात हिंदुस्थानात फारशा लढाया झाल्या नाहीत व सर्वत्र शांतता नांदत होती

ब) शहाजहानने आपल्या काळात बरेचसे भोक्ते असणारे लोक व विद्वान कवि, चित्रकार यांना आश्रय दिला होता

क) शहाजहानचे काळात आर्थिक भरभराट खुप झाली होती

ड) शहाजहानचे काळात परदेशातून आलेल्या कवि, चित्रकार, विद्वान लोकांनी आपल्या बरोबर त्या कला व विद्या आणल्या होत्या .

# परिशिष्ट VII

## चाचणी क्र 1

| | प्रायो. गट | नियंत्रित गट |
|---|---|---|
| 1) गटातील विद्यार्थी संख्या | N1 = 25 | N2 = 25 |
| 2) प्रारंभिक चाचणीचे मध्यमान | 10.16 | 10.32 |
| 3) प्रारंभिक चाचगीचे प्रमाणविचलन | 2.76 | 2.30 |
| 4) प्रायोगिक उपायानंतर दिलेल्या चाचणीचे मध्यमान | M1 = 14.12 | M2 = 11.08 |
| 5) प्रायोगिक उपायानंतर दिलेल्या चाचणीचे प्रमाणविचलन | $\sigma_1$ = 4.07 | $\sigma_2$ = 5.10 |
| 6) अंतिम गुणातील संहसंबंधगुणक | $r$ = .27 | |

माध्यांच्या प्रमाणत्रुटी काढणे

$$\sigma_{M1} = \frac{\sigma_1}{\sqrt{N1}} = \frac{4.07}{\sqrt{25}} = \frac{4.07}{5} = .81$$

$$\sigma_{M2} = \frac{\sigma_2}{\sqrt{N2}} = \frac{5.10}{\sqrt{25}} = \frac{5.10}{5} = 1.02$$

2) माध्यातील फरकाची प्रमाणत्रुटी काढणे.

$\sigma_{M1}$ = .81 $\sigma_{M2}$ = 1.02 आणि $r$ = . 27

या किंमती सुत्रात ठेवून

$$\sigma_D = \sqrt{\sigma^2_{M1} + \sigma^2_{M2} - 2r\,\sigma_{M1}\sigma_{M2}}$$

$$\sigma_D = \sqrt{(.81)^2 + (1.02)^2 - 2(.27)(.81)(1.02)}$$

$$\sigma_D = \sqrt{.6561 + 1.0404 - 2(.223074)}$$

$$\sigma_D = \sqrt{1.6965 - 446148}$$

$$\sigma_D = \sqrt{1.250352}$$

$$\sigma_D = 1.11$$

3) माध्यातील फरक (D) = M1 - M2

= 14.12 - 11.08

= 3.04

D = 3.04 आणि $\sigma D$ = 1.11 हया किंमती

$t = D/\sigma D$ या सुत्रात ठेवून

$$t = \frac{3.04}{1.11} = 2.73$$

स्वाधिनता मात्रा = N- 1 = 24

यात जोडया 25 असल्याने स्वाधिनता मात्रा । ने कमी म्हणजे 24 राहील.

सार्थकता स्तर .05 निवडला असल्याने त्या स्तरावर df 24 करिता नमुना t मुल्य काढावे लागेल.

.05 स्तरावर df 24 करिता नमुना t मुल्य 2.06 असून पाप्त t मुल्य 2.73 ची सार्थकता 2.06 पेक्षा निश्चितच मोठा असल्याने सार्थक राहील.

# परिशिष्ट VIII

## चाचणी क्र. 2

| | प्रायो.गट | नियंत्रित गट |
|---|---|---|
| गटातील विद्यार्थी संख्या. | N1 =25 | N2 = 25 |
| प्रारंभिक चाचणीचे मध्यमान | 10.16 | 10.32 |
| प्रारंभिक चाचणीचे प्रमाणविचलन | 2.76 | 2.30 |
| प्रायोगिक उपायानंतर दिलेल्या चाचणीचे माध्य | 16.32 | 10.76 |
| प्रायोगिक उपायानंतर दिलेल्या चाचणीचे प्रमाण विचलन | 4.16 | 3.96 |
| अंतिम गुणातील सहसंबंधगुणक | γ= .33 | |

1) माध्यांच्या प्रमाणत्रुटी काढणे.

$$\sigma_{M1} = \frac{\sigma_1}{\sqrt{N_1}} = \frac{4.16}{\sqrt{25}} = \frac{4.16}{5} = .83$$

$$\sigma_{M2} = \frac{\sigma_2}{\sqrt{N_2}} = \frac{3.96}{\sqrt{25}} = \frac{3.96}{5} = .79$$

2) माध्यातील फरकाची प्रमाणत्रुटी काढणे.

$\sigma_{M1} = .83$ $\sigma_{M2} = .79$ बस्कफर आणि $\gamma = .33$

या किंमती सुत्रात ठेवून.

$$\sigma_D = \sqrt{\sigma_{M_1}^2 + \sigma_{M_2}^2 - 2\gamma\, \sigma_{M1} \cdot \sigma_{M2}}$$

$$\sigma_D = \sqrt{(.83)^2 + (.79)^2 - 2(.33)\ (.83)\ (.79)}$$

$$\sigma_D = \sqrt{.6889 + .6241 = 2\ (.216381)}$$

$$\sigma_D = \sqrt{1.313 - .432762}$$

$$= \sqrt{.880238}$$

$\sigma_D$ = .93

माध्यातील फरक = (D) = M1 - M2

= 16.32 - 10.76

= 5.56

D = 5.56 आणि $\sigma_D$ = .93 हया किंमती $t = D/\sigma_D$ या सुत्रात ठेवून

$$t = \frac{5.56}{.93} = 5.97$$

4) स्वाधिनता मात्रा N-1 = 24

यात जोडया 25 असल्याने स्वाधिनता मात्रा 1 ने कमी म्हणजे 24 राहील.

5) संशोधिकेने सार्थकता स्तर .05 निवडला असल्याने त्या स्तरावर df = 24 करिता नमुना t मूल्य काढावे लागेल.

.05 स्तरावर df =24 करिता नमुना t मूल्य 2.06 असून प्राप्त t मूल्य 5.97 हेअसून नमुना t मुल्य (2.06) पेक्षा ते निश्चितच मोठे असल्याने ते सार्थंक राहील.

निर्णय - .05 सार्थंकता स्तरावर प्र प्राप्त t सार्थंक असल्यानेशून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. कारण पडलेला फरक वास्तविक फरक आहे.

# परिशिष्ट क्र. IX
## चाचणी क्र. 3

| | प्रायो.गट | नियंत्रित गट |
| --- | --- | --- |
| गटातील विद्यार्थी संख्या | N1 = 25 | N2 = 25 |
| प्रारंभिक चाचणीचे मध्यमान | 10.16 | 10.32 |
| प्रारंभिक चाचणीचे प्रमाणविचलन | 8.75 | 7.30 |
| प्रायोगिक उपायानंतर दिलेल्या चाचणीचे मध्यमान | M1=17.4 | M2 = 14.16 |
| प्रायोगिक उपायानंतर दिलेल्या चाचणीचे प्रमाणविचलन | $\sigma_1 = 3.21$ | $\sigma_2 = 3.31$ |
| अंतिम गुणांतील सहसंबंधगुणक | $r = .066$ | |

1) माध्याच्या प्रमाणत्रुटी काढणे

$$\sigma_{M1} = \frac{\sigma_1}{\sqrt{N1}} = \frac{3.21}{\sqrt{25}} = \frac{3.21}{5} = .64$$

$$\sigma_{M2} = \frac{\sigma_2}{\sqrt{N2}} = \frac{3.31}{\sqrt{25}} = \frac{3.31}{5} = .66$$

2) माध्यातील फरकाची प्रमाणत्रुटी काढणे.

$\sigma_{M1} = .64$ $\sigma_{M2} = .66$ आणि $r = .066$ या किंमती सुत्रात ठेवून—

$$\sigma_D = \sqrt{\sigma_{M1}^2 + \sigma_{M2}^2 - 2r\,\sigma_{M1}\cdot\sigma_{M2}}$$

$$\sigma_D = \sqrt{(.64)^2 + (.66)^2 - 2\,(.66)\,(.64)\,(.066)}$$

$$\sigma_D = \sqrt{.4096 + .4356 - 2(.0278784}$$

$$\sigma_D = \sqrt{.8452 - .557568}$$

$$\sigma_D = \sqrt{.287632}$$

$$\sigma_D = .53$$

माध्यातील फरक (D) = M1 - M2

= 17.4 - 14.16

D = ~~3.24~~ 3.24 आणि $\sigma_D$ = .53

हया किंमती $t = D / \sigma_D$ या सुत्रात ठेवून —

$$t = \frac{3.24}{.53} = 6.11$$

स्वाधिनता मात्रा N - 1 = 24

यात 25 जोडया असल्याने स्वाधिनता मात्रा 1 ने कमी म्हणजे 24 राहील.

सार्थकता स्तर .05 असल्याने या स्तरावर df = 24 करिता नमुना $t$ मूल्य काढावे लागेल. .05 स्तरावर df =24 करिता नमुना $t$ मूल्य 2.06 प्राप्त $t$ चा सार्थकता = प्राप्त $t$ (6.11) हा नमुना $t$ (2.06) पेक्षा मोठा असल्याने तो सार्थक राहील.

निर्णय :- .05 सार्थकता स्तरावर प्राप्त $t$ सार्थक असल्याने शॅून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

# परिशिष्ट X
## एकत्रित तीन चाचण्या

| | प्रायो.गट | नियंत्रित गट |
|---|---|---|
| गटातील विद्यार्थी संख्या | N1 = 25 | N2 = 25 |
| प्रारंभिक चाचणीचे मध्यमान | 10.16 | 10.32 |
| प्रारंभिक चाचणीचे प्रमाणविचलन | 8.75 | 7.30 |
| प्रायोगिक उपायानंतर दिलेल्या चाचणीचे मध्यमान | M1 = 15.91 | M2 = 11.44 |
| प्रायोगिक उपायानंतर दिलेल्या चाचणीचे प्रमाणविचलन | $\sigma_1 = 3.23$ | $\sigma_2 = 3.87$ |
| अंतिम गुणातील सहसंबंधगुणक | $\gamma = .21$ | |

i) माध्याच्या प्रमाणत्रुटी काढणे.

$$\sigma_{M1} = \frac{\sigma_1}{\sqrt{N_1}} = \frac{3.23}{\sqrt{25}} = \frac{3.23}{5} = .64$$

$$\sigma_{M2} = \frac{\sigma_2}{\sqrt{N2}} = \frac{3.87}{\sqrt{25}} = \frac{3.87}{5} = .77$$

ii) माध्यातील फरकाची प्रमाणत्रुटी काढणे.

$\sigma_{M1} = .64$ $\sigma_{M2} = .77$ आणि $\gamma = .21$ या किंमती सुत्रात ठेवून–

$$\sigma_D = \sqrt{\sigma_{M1}^2 + \sigma_{M2}^2 - 2\gamma\, \sigma_{M1} \cdot \sigma_{M2}}$$

$$\sigma_D = \sqrt{(.64)^2 + (.77)^2 - 2\ (.21)\ (.64)\ (.77)}$$

$$\sigma_D = \sqrt{.4096 + .5929 =- 2\ (.103488)}$$

$$\sigma_D = \sqrt{1.0025 - .206976}$$

$$\sigma_D = \sqrt{.795524}$$

$$\sigma_D = .89$$

iii) माध्यातील फरक = (D) = M1 - M2

= 15.91 - 11.44

= 4.47

iv) D = 4.47 आणि $\sigma_D$ = .89 ह्या किंमती

$t = D/\sigma_D$ या सुत्रात ठेवून –

$= \frac{4.47}{.89} = 5.02$

$t = 5.02$

V) स्वाधिनता मात्रा N - 1 = 24

यात जोडया 25 असल्याने स्वाधिनता मात्रा 1 ने कमी म्हणजे 24 राहील.

vi) संशोधीकेने सार्थकता स्तर .05 निवडला असल्याने त्या स्तरावर df 24 करिता नमुना t मूल्य काढावे लागेल. .05 स्तरावर df 24 करिता नमुना t मूल्य 2.06

vii) प्राप्त t व नमुना t याच्या तुलनेवरून प्राप्त t ची सार्थकता प्राप्त t (5.02) हा नमूना t (2.06 ) पेक्षा मोठा असल्याने तो सार्थक राहील.

viii) निर्णय - .05 सार्थकता स्तरावर प्राप्त t सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. माध्यातील फरक हा .05 सार्थकता स्तरावर सार्थक असल्याने तो फरक न्यादर्शन चढ उतारामुळे पडलेला नसून वास्तविक फरक आहे. प्रायोगिक गटाचे मध्यमान नियंत्रित गटाच्या मध्यमानापेक्षा आधिक असल्याने माध्यातील फरक प्रायोगिक उपायांना अनुकूल आहे. तो सार्थकही असल्याने प्रायोगीक उपायामुळे गुणात वाढ झाली व तो आधिक परिणामकारक आहे असा ही निष्कर्षही काढता येईल.

परिशिष्ट XI

प्रा. सौ. पी. डी. देसाई.
एम. ए. एम्. एड्.
कॉलेज ऑफ एज्युकेशन,
कराड.

माननीय इतिहास शिक्षक,

संत तुकाराम हायस्कूल, कराड / यशवंत हायस्कूल, कराड.

मी शिवाजी विद्यापीठांच्या शिक्षणशास्त्र विभागात एम्. फिल. पदवीचा अभ्यास करीत आहे. सदर पदवीच्या अंशत: पूर्तीसाठी एखाद्या शैक्षणिक समस्येवर संशोधन करावे लागते. मी संशोधनासाठी पुढील समस्या निवडलेली आहे.

" कनिष्ट माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्यापनातील कथाकथन पध्दती अधिक परिणाम-कारक होण्याच्या दृष्टीने केलेला अभ्यास."

प्रस्तुत संशोधन अभ्यास प्रायोगिक पध्दतीने करावयाचा आहे. कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्यासाठी आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ व्हावा. हया हेतूने सोबत दिल्या जाणा-या कथाकथनाच्या निकषांच्या तक्त्यांचे आधारे प्रत्येक पाठ्यघटकाचे अध्यापनाचे वेळी निरीक्षण करावे व कथाकथन पध्दतीच्या अध्यापनात मार्गदर्शनपर सूचना द्याव्यात ही विनंती.

आपल्या निरीक्षणाने योग्य मार्गदर्शन होऊन कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने हातभार लागेल अशी इच्छा व्यक्त करते.

आपली कृपाभिलाषी

सौ.पी.डी. देसाई.

शिक्षक यादी -श्रीसंत तुकाराम हायस्कूल, कराड.

| शिक्षकांचे नांव. | शैक्षणिक अर्हता | अध्यापनानुभव |
|---|---|---|
| 1) श्री. साठे रामचंद्र बाबुराव | बी.ए.बी.एड्. | 25 |
| 2) श्री. नागनुरे नारायण शंकर | एम.ए.बी.एड्. | 24 |
| 3) श्री. माने रामचंद्र केशव | बी.ए.बी.एड्. | 18 |
| 4) श्री. थोरात बबन बाजीराव | बी.कॉम. बी.एड्. | 15 |
| 5) श्री. गुरव आधिकराव शामराव | बी.एस्सी.बी.एड्. | 12 |

शिक्षक यादी - यशवंत हायस्कूल, कराड.

| शिक्षकांचे नांव. | शैक्षणिक अर्हता | अध्यापनानुभव |
|---|---|---|
| 1) श्री. गायकवाड बळीराम जयसिंग | बी.ए.बी.एड्.<br>सी.पी.एड्. | 32 |
| 2) श्री. वास्के जयंत सखाराम | बी.ए. एम.एड्. | 26 |
| 3) श्री. भांबूरे लक्ष्मण हरी | एम.ए. बी.एड्. | 25 |
| 4) श्री. कुंभार महादेव बापू | एम.ए. बी.एड्. | 17 |
| 5) श्री. शिंदे श्रीमंत अण्णा | बी.ए.बी.एड्. | 16 |

यशवंत हायस्कूल, कराड

शिक्षक- निरीक्षण तक्ता

इयत्ता 5 वी विषय - इतिहास घटक

सूचना - खाली दिलेल्या निरिक्षण तक्त्यामध्ये पुढील विधानापुढे दिलेल्या रकान्या-तील ज्या पर्यायाशी सहमत असाल त्या रकान्यात (✓) बरोबर अशी खूण करा.

| विधाने | पूर्णपणे | अंशत: | अजिबात नाही. |
|---|---|---|---|
| 1) कथेची भाषा योग्य व प्रभावी होती. | | | |
| 2) कथेतील घटनांचा क्रम योग्य होता. | | | |
| 3) कथा निवेदिका आपल्या कथाकथनाशीव विद्यार्थ्यांशी एकरूप झाली होती. | | | |
| 4) कथा निवेदिकेने आवाजातील चढउताराकडे कटाक्षाने लक्ष पुरविले होते. | | | |
| 5) कथा निवेदिकेचा शारीरिक अभिनय व मुद्राभिनय परिणामकारक होता. | | | |
| 6) कथा निवेदिकेने बहुश्रूतपणाचा वापर करून कथा भरदार, डौलदार बनविण्याचा प्रयत्न केला होता. | | | |
| 7) कथा निवेदिकेने वेळेचे भान ठेवले होते. | | | |
| 8) कथा निवेदिकेने चित्रमयतेचा वापर करून कथा खुलविण्याचा प्रयत्न केला होता. | | | |
| 9) कथेतील पात्रांची भाषा त्यांची स्वभाव-वैशिष्टये प्रकट करणारी होती. | | | |
| 11) कथाकथन पध्दतीच्या अध्ययनात विद्यार्थी तन्मय, एकाग्र झाले होते. | | | |

| विधाने | पूर्णपणे | अंशतः | अजिबात नाही |
|---|---|---|---|
| 12) कथाकथन पध्दतीच्या अध्ययनात विद्यार्थी उत्साही दिसत होते. | | | |
| 13) तोंडी मूल्यमापनात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला मिळाला होता. | | | |

परिशिष्ट XII

यशवंत हायस्कूल, कराड

विद्यार्थी प्रतिक्रिया प्रश्नावली

इयत्ता 5 वी. विषय - इतिहास.

सूचना - खालील विधाने लक्षपूर्वक वाचा व प्रत्येक विधानापुढे दिलेल्या रकान्यातील ज्या पर्यायाशी सहमत असाल त्या रकान्यात ( ✓ ) बरोबर अशी खूण करा.

| विधाने | पूर्णपणे | अंशत: | अजिबात नाही. |
|---|---|---|---|
| 1) कथा स्वरूपात सांगितलेली ऐतिहासिक माहिती नेहमीच्या पध्दतीपेक्षा चांगल्या प्रकारे आकलन झाली. | | | |
| 2) कथेच्या स्वरूपात ऐतिहासिक माहिती समजून घेत असतांना उत्सुकता वाढत होती. | | | |
| 3) शिक्षिकेने योग्य ते हावभाव, हालचाल केल्यामुळे आशय परिणामकारक वाटला. | | | |
| 4) कथाकथन पध्दतीने सांगितलेली माहिती जास्त काळ स्मरणात राहिली. | | | |
| 5) कथाकथन पध्दतीने भारतातील थोर व्यक्तींचा इतिहास मनोरंजक वाटला. | | | |
| 6) कथाकथन पध्दतीने इतिहासातील थोर व्यक्तींची स्वभाव वैशिष्टये आत्मसात होण्यास मदत झाली. | | | |
| 7) शिक्षिकेच्या कथन शैलीमुळे अध्यापन परिणामकारक वाटले. | | | |

परिशिष्ट XIII - अ

विद्यार्थी प्रश्नावली भरून देणा-या प्रायोगिक गटातील विद्यार्थ्यांची यादी.

1) कु. इनामदार हसिना यासिन
2) कांबळे अनिल यशवंत
3) कु. कुर्ले वर्षाली सुभाष.
4) खलिफा फेरूज आशरफ अल्ली.
5) खांडेकर शंकर शिवाप्पा.
6) कु. गवळी रूपाली आनंदा
7) जावळे लक्ष्मण पांडुरंग
8) नायकवडी सलीम मुबारक
9) बेनकर रामविलास मेघाप्रसाद.
10) कु. भागवत स्मिता जयंत
11) मलबारी रफिक अजिज
12) कु. मकानदार शैनाज खाजमियाँ
13) मलबारी रमजान अजिज
14) मुल्ला करीम मकबुल
15) कु. मुंढेकर सारिका यशवंत.
16) कु. यादव जयश्री रामचंद्र.
17) कु. लावंड छाया जगन्नाथ
18) लाखे युवराज रंगा
19) कु. लोणारी सुनिता विठ्ठल.
20) कु. शिंदे वनिता सुभाष
21) कु. शेख जस्मिन जेबुद्दीन.
22) संघवी जगदीशकुमार शांतीलाल.
23) संदे आशरफअल्ली शहाबुद्दीन.
24) सुर्यवंशी अभय भानुदास
25) होबळे नासीर अब्दुलजब्बार.

XIII - ब

नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांची यादी.

1) कलुर नागेंद्र शरणाप्पा.
2) कु. काशिद संगिता बाळकृष्ण.
3) काळे सुनिल गजानन
4) कांबळे रत्नाकर श्रीपती
5) खांडे रविंद्र शंकर.
6) कु. चौगुले रेखा शंकर
7) देसाई अरूण अविनाश
8) धोंगडी अमोल अशोक
9) कु. पालकर अन्वरबी रूनउद्दीन
10) कु. पुजारी रश्मी गौरीशंकर
11) कु. पोळ छाया श्रीमती
12) पोळ शरद भिमराव.
13) बर विमल यशवंत
14) कु. माळी सुनिता यदु
15) मुल्ला फिरोज गफूर
16) मुल्ला सिकंदर बशीर
17) कु. मुल्ला जब्बीन जाफर
18) मोनीन समीर मुल्ला
19) कु. राजमाने सविता रामचंद्र
20) रैनाक गणेश शंकर
21) शेळके संतोष बाळू
22) कु. शेख शिरीन समशेर
23) साळुंखे संदीप बबन
24) साळुंखे चारूदत्त शिवाजी
25) कु. सुर्यवंशी मीना अशोक